भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

AM 259982

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2018 ◐

अनु. क्र. 12858 दि. 27/12/2018 मु.शु. रक्कम 500

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय / नाही

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक ... मे. वाकडकर विनोद असोसिएट्स

पत्ता ... कसबा पुणे ०१.

दुसऱ्या ...

पत्ता

हस्ते व्यक्ती ... गुणवंत डी जाधव

वरीलप्रमाणे

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

रोहिदास एच. पवार
परवाना क्र. 2201082
430 मंगळवार पेठ, पुणे - 11

अतिरिक्त कोषागार अधिकारी
पुणे

11 DEC 2018

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
Mr. Dnyaneshwar Babasaheb Kolgir
Area Pune Dist.
Reg. No. 8041
Exp. Dt. 09/06/2023
GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक २७ माहे डिसेंबर सन २०१८ इसवी ते दिवशी....

आम्ही खाली सही करणार १) श्री. श्रीरंग मारूती साखरे, २) श्री. पांडुरंग मारूती साखरे, ३) श्री. लक्ष्मण मारूती साखरे, ४) श्री. काळूराम मारूती साखरे, ५) श्री. चेतन शिवाजी साखरे, ६) श्री. गणेश ज्ञानेश्वर साखरे, ७) श्री. शुभम ज्ञानेश्वर साखरे तर्फे कुलमुखत्यारधारक म्हणून मे. वाकडकर विनोदे असोसिएटस् तर्फे भागीदार श्री. विशाल यशवंत वाकडकर, पत्ता : ७०९ न्यूक्लीस मॉल, कॅम्प, पुणे – ४११००१ सत्य हमीपत्र लिहून देतात की,

मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे, ग्रामपंचायत मौजे हिंजवडी येथील १) सर्व्हे नंबर २६५/२/१ब क्षेत्र १२१०० चौ.मी. पैकी क्षेत्रफळ ३१२८ चौ.मी., २) सर्व्हे नंबर २६५/२/१क क्षेत्र ६१०० चौ.मी. पैकी क्षेत्रफळ ४२४२ चौ.मी., ३) सर्व्हे नंबर २६५/२/२ क्षेत्र ११९०० चौ.मी. पैकी क्षेत्रफळ ५१२० चौ.मी., ४) सर्व्हे नंबर २६६/१ क्षेत्र ७५०० चौ.मी. पैकी क्षेत्रफळ ६९७ चौ.मी., म्हणजेच एकुण क्षेत्र १३१८७ चौ.मी. धारण केलेले आहे. सदरील मिळकतीमध्ये निवासी/बिगर निवासी पध्दतीचे प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जमीन मालक म्हणून आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे कडून पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध होवू शकत नाही याची माहिती आम्हाला देण्यात आली असून पर्याय म्हणून जागेवरील बोअरव्दारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टॅकरव्दारा पाणी मिळण्याची किंवा व्यवस्था करीत आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भुवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहिल.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी/बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे पिण्यासाठी पुरेसा पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या

नात्याने इमारतीमधील रहिवाश्यांना आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी आम्ही या हमीपत्राव्दारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे मार्फत कोणताही पाणी पुरवठा न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास आम्ही कोणत्याही कोर्टाकडे दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे बुकींग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थितीचे जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुध्दा याठिकाणी होणाऱ्या बुकींगनंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे पुरेसा पाणी पुरवठा सुरू होईपर्यंत आमच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा देण्याची आमची जबाबदारी राहिल.

५) टॅकरव्दारा किंवा बोअरव्दारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची आम्ही काळजी घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने आमचे अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक/प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेऊ.

७) हे हमीपत्र आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहिल.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र आम्ही राजीखुषीने दिनांक २७/१२/२०१८ रोजी लिहून दिले असे.

पुणे
दिनांक : २७/१२/२०१८

हमीपत्र करणार

मे. वाकडकर विनोदे असोसिएटस्
तर्फे भागीदार
श्री. विशाल यशवंत वाकडकर
(कुलमुखत्यारधारक)

BEFORE ME

ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA

Noted & Registered Book No. 23
At Serial Number 06/2019
On 1/01/2019

1 JAN 2019